## वसुंधरा महोत्सव : दयानंद महाविद्यालयाचा प्रथम क्रमांक

# पथनाट्यातून 'नदी वाचवा' संदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : किर्लोस्कर समूहाने आयोजित केलेल्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आजच्या अखेरच्या दिवशी दयानंद महाविद्यालयात पथनाट्य स्पर्धेचे आयोजन केले होते. यामधून विद्यार्थ्यांनी 'नदी वाचवा, जीवन वाचवा' हा संदेश दिला. या स्पर्धेत 'दयानंद'च्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. ऑर्किड कॉलेज द्वितीय; तर वालचंद अभियांत्रिकीने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

या स्पर्धेत शहरातील आठ महाविद्यालयांच्या संघांनी भाग घेतला होता. नदी कशा प्रकारे प्रदूषित होते व त्याचा मानवाच्या जीवनावर किती गंभीर परिणाम होतो, हे विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून अभिनयाद्वारे दाखवून दिले. राजकीय नेत्यांवर टीका करणाऱ्या संवादाला दाद मिळाली. नेतेमंडळी फक्त आश्वासने देतात अन् नदीसाठी आलेला पैसा इतरत्र वापरतात, हे निदर्शनास आणून देण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला. 'नदी वाचवाल तर जीवन वाचेल' अशा घोषणाही काही पथनाट्यातून देण्यात आल्या. या स्पर्धेत चौथा क्रमांक 'बीएमआयटी' महाविद्यालयाने; तर पाचवा क्रमांक लोकमंगल बायोटेक महाविद्यालयाने मिळविला. पथनाट्य स्पर्धेचे परीक्षक म्हणून वसुंधरा कुलकर्णी यांनी काम पाहिले.

यावेळी दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. उबाळे, डॉ. व्ही. सी. दंडे, डॉ. आर. एन. माळी आदी उपस्थित होते. ऋषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

### साखर कारखान्यासंदर्भात कार्यशाळा

वसुंधरा महोत्सवाच्या निमित्ताने साखर कारखान्यांच्या प्रतिनिधींची कार्यशाळा वालचंद महाविद्यालयात आयोजित केली होती. यावेळी प्रत्येक साखर कारखान्यांनी आपला कच्चा माल आणि सांडपाण्यावर प्रक्रिया करुन तो पुन्हा वापरण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी वालचंद अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे, उस्मानाबाद नॅचरल शुगरचे बी. बी. ठोंबरे, वीरेंद्र चित्राव, डॉ. एस. पी. वैद्य आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. नरेंद्र काटीकर यांनी केले.



वसुंधरा महोत्सवात शनिवारी दयानंद महाविद्यालयामध्ये आयोजित पथनाट्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी नदी प्रदूषणावर सादरीकरण केले.